# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-23.06.2026** **वार- मंगळवार**

---

**विधानपरिषद**

शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅसचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासन सकारात्मक असून, काही कारणांमुळे बंद पडलेली शिवभोजन केंद्रं लवकरच पुन्हा सुरू करण्यात येतील, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. राज्यातल्या विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातल्या शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅस पुरवठा करण्याबाबत सदस्य उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना भुजबळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. ज्या भागांमध्ये एमजीएनएलची गॅस वितरण व्यवस्था उपलब्ध आहे, तिथल्या शिवभोजन केंद्रांनी अर्ज केल्यास त्यांना पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा उपलब्ध करून देता येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**सफाईकामगार**

सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न जिल्हा प्रशासनानं तातडीनं मार्गी लावावेत, तसंच सफाई कामगारांचं सर्वेक्षण करुन त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या केंद्रीय निगरानी समितीचे सदस्य भगवत प्रसाद मकवाना यांनी दिले. सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या आणि त्याचं निराकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

**पुरस्कार**

पुणे महानगरपालिकेचा बालगंधर्व पुरस्कार २०२६ मराठी रंगभूमी, साहित्य, चित्रपट आणि सांस्कृतिक क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ रंगकर्मी आणि साहित्यिक चंद्रकांत काळे यांना जाहीर करण्यात आला आहे. महापौर मंजुषा नागपुरे यांनी आज ही माहिती दिली. यंदाच्या बालगंधर्व पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवर कलाकार आणि कार्यकर्त्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. तसंच २०२० आणि २०२१ या वर्षांत पुरस्कार वितरण समारंभ होऊ शकला नव्हता. त्यामुळे यंदाच्या सोहळ्यात २०२० आणि २०२१ मधील पुरस्कार विजेत्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ कलाकार सुरेश साखळकर यांच्या हस्ते २५ जून रोजी बालगंधर्व रंगमंदिरात पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

**अतिक्रमण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत शहरातल्या विविध शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरातील अनधिकृत टपऱ्या, पानटपऱ्या आणि तत्सम अतिक्रमणांवर आज विशेष कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं तसंच शैक्षणिक संस्थांच्या परिसरात स्वच्छ, सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशानं ही मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान एकंदर 35 अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या. महापालिकेच्या वतीनं शाळा आणि महाविद्यालय परिसरातली अतिक्रमणे, अनधिकृत व्यावसायिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोहोचविणाऱ्या बाबींवर नियमितपणे लक्ष ठेवण्यात येत असून अशा कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहेत, असं आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी सांगितलं.

**पाणीपुरवठा**

पवना धरणातल्या पाणीसाठ्यात झालेली घट आणि मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने आणि जबाबदारीने वापर करावा, असं आवाहन महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलं आहे. पिण्याच्या पाण्याचा वापर करून जलतरण तलाव भरणे तसंच वाहन धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करणे यावर बंदी घालण्यात आली असून नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पाणी बचतीच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष तपासणी पथकं नियुक्त करण्यात आली आहेत.

**पुरस्कार**

फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचतर्फे देण्यात येणारा छत्रपती शाहूजी महाराज पुरस्कार महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले आणि सामाजिक कार्यकर्त्या प्राची दुधाणे यांना प्रदान केला जाणार आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते २५ जून रोजी पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

**अधिवेशन**

भारत-भारती संस्थेचं पाचवं राष्ट्रीय अधिवेशन २६ ते २८ जून या कालावधीत पुण्यात आयोजित करण्यात आलं आहे. सुमारे साडे तीनशे प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत, अशी माहिती भारत-भारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष विनय पत्राळे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रीय एकात्मता, संस्कृती आणि संघटन या त्रिसूत्रीचा अवलंब करून वाटचाल करीत असलेली ही संस्था स्थानिक नागरिकांसह परराज्यांमधून आलेल्या नागरिकांमध्ये एकात्मतेची भावना वाढावी यासाठी कार्यरत आहे.

**सायकलवारी**

इंडो अथलेटिक्स सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेली दहावी पुणे–पंढरपूर सायकल वारी शनिवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. देहूमधून पहाटे प्रस्थान केलेल्या या वारीत दोन हजार ३५० सायकलस्वारांनी सहभाग नोंदवत २३५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला.
वारीचं हे दहावे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व सहभागी सायकलस्वारांनी एका दिवसात देहू ते पंढरपूर हा प्रवास पूर्ण केला. विशेष बाब म्हणजे यंदा सुमारे ३०० महिला आणि १०० हून अधिक बालसायकलस्वारांनी सहभाग घेतला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात हवामान ढगाळ असून पावसाच्या तुरळक सरी पडत आहेत. जिल्ह्यात काल इंदापूर तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली. आजही तुरळक पावसाच्या सरींचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.  उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**